# R C .Patel Arts Science and Commerce College, & H R Patel Mahila College,Shirpur Dhule, Maharashtra

## Department of Physical Education & Sports

Association with

**Physical Education Foundation of India**

(Recognized as National Sports Promoting Organization by Ministry of Youth Affairs and Sports)

**District Sports Office, Dhule Maharashtra**

**Krida Shishak Mahasangh, Dhule**

**National Webinar**

**25 June to 28 June 2020**

# Sports Specific Conditioning Program



Football, Handball, Basketball, Athletic, Badminton Specific Conditioning

zoom

पुण्य नगरी

www.epunyanagari.com Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

औरंगाबाद ◆ बुधवार, १ जुलै २०२० । वर्ष : १८ । अंक : ३२९ । पाने ८+४= १२ ★ किंमत : ३

पुण्य नगरी

# पटेल महिला महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनार

**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयातील क्रीडा विभागांतर्गत स्पोर्ट्स स्पेसिफिक स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशनिंग प्रोग्राम यावर आधारित राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन फिजिकल एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया, डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स ऑफिस धुळे आणि क्रीडाशिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले.




या चार दिवसीय वेबिनारमध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, केरळ, हैद्राबाद, झारखंड, मनिपुर, दिल्ली, राजस्थान व पंजाब अशा अनेक राज्यातील ५६०० च्यावर विद्यार्थी, शिक्षक, मार्गदर्शक यांनी सहभाग नोंदविला होता. कार्यशाळेचे आयोजन झूम अॅप व फेसबुक लाईव्ह या माध्यमातून करण्यात आले. या वेबिनारचे मुख्य उद्दिष्ट कोविड-१९ च्या लॉकडाऊनच्या काळात विविध खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक, शिक्षक यांना स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशनिंग या विषयाचे मार्गदर्शन मिळावे व खेळाडूंनी घरी राहून त्याविषयी आकलन करून घ्यावे, असे होते.

या वेबिनारच्या उद्घाटनप्रसंगी फिजिकल एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ इंडियाचे सचिव डॉ. पियुष जैन, जिल्हा क्रीडाधिकारी संजय सबनीस, क्रीडाशिक्षक महासंघाचे उपाध्यक्ष आनंद पवार, प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, प्राचार्य डॉ. शारदा शितोळे उपस्थित होते. साधन व्यक्ती म्हणून डॉ. कविता खोलगडे (बॅडमिंटन स्ट्रेंथ कंडिशनिंग), डॉ. राकेश तोमर (लाँग डिस्टन्स स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशनिंग), डॉ. जयप्रकाश भुकर (शॉर्ट डिस्टन्स स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशन), डॉ. आशिष फुलकर (हँडबॉल स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशनिंग), डॉ. कामेंदरसिंग ठाकूर (कबड्डी स्ट्रेन्थ अॅण्ड कंडिशनिंग), डॉ. बिरेन्द्र झांजरिया (बास्केटबॉल स्ट्रेन्थ अॅण्ड कंडिशनिंग), डॉ. नरेंद्र गंगवार (फुटबॉल स्ट्रेंथ अॅण्ड कंडिशनिंग) यांनी मार्गदर्शन केले. एक्सपर्ट पॅनलमध्ये डॉ. विनोद पाटील, डॉ. भरत चालसे, प्रा. अरविंद कांबळे, डॉ. लिंबाजी पडताळे, डॉ. गोविंद मारतळे, डॉ. आनंद उपाध्याय आणि परेश शिवलकर यांनी मार्गदर्शन केले. टेक्निकल कमिटीत मोसिन कुरेशी, गणेश काटकर यांनी काम पाहिले. वेबिनारसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दिनेश पाटील तसेच प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, प्राचार्य डॉ. शारदा शितोळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनय पवार, प्रा. हर्षदा पाटील यांनी परिश्रम घेतले. या आयोजनाबद्दल संस्थापक अध्यक्ष व माजी शिक्षणमंत्री अमरिशभाई पटेल, नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, संस्थेचे अध्यक्ष भुपेशभाई पटेल, उपाध्यक्ष तथा नगरसेवक तपनभाई पटेल, चेअरमन राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरु डॉ. के.बी. पाटील यांनी कौतुक केले.